<u>वित्तीय मान्यता-</u>

सन २०१६-१७ मधील राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत (NMSA) मृद आरोग्य पत्रिका (SHC) योजनेसाठी अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता अखर्चित राहिलेला निधी वितरीत करण्याबाबत.

<u>(केंद्र हिस्सा रू. १११.४६ लाख व राज्य हिस्सा रू.७४.३१ लाख)</u>

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुरक २५१७ / प्र.क्र.१२० / १७ अे
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय,विस्तार,मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ७ डिसेंबर, २०१७

<u>वाचा :-</u>

१) केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या सांकेतिक स्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानाअंतर्गत मृद आरोग्य पत्रिका या योजनेच्या मार्गदर्शक सुचना
२) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. मृदस १४१६/प्र.क्र. १४४/ १७ अे, दि.०८.०६.२०१६
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. १६-२/२०१५ - फर्ट युज, दि. ३०.०३.२०१७
४) केंद्र शासनाचे पत्र क्र. १४-०१/२०१५ - फर्ट युज (A), दि. १८.०४.२०१७
५) कृषि आयुक्तलयाचे पत्र क्र. मृसमृचा/निवगुनि/मृआ/५९४/२०१७, दि.११.०९.२०१७ चे पत्र.
६) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत (NMSA) मृद आरोग्य पत्रिका योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने केंद्र हिश्याचा दुस-या हफ्त्यापोटी रू. ६९५.६७ लाख निधी (सर्वसाधारण प्रवर्ग रू.५२८.४६ लाख , अनुसूचित जाती प्रवर्ग रू. १११.४६ लाख, अनुसूचित जमाती प्रवर्ग रू. ५५.७३ लाख) निधी दि. ३० मार्च, २०१७ च्या पत्रान्वये वितरीत केला होता. केंद्र शासनाचे पत्र या विभागास उशिराने प्राप्त झाल्याने सदर निधी वितरीत होऊ शकला नाही. तद्नंतर केंद्र शासनाने दिनांक १८.०४.२०१७ च्या पत्रान्वये सदरचा निधी रू. ६९५.६७ लाख निधी पुर्नजिवित करून दिलेला आहे. त्यामुळे त्यामधील अनुसूचित जाती प्रवर्गाची केंद्र हिश्याची रक्कम रू. १११.४६ लाख व त्याप्रमाणात राज्य हिश्याची रक्कम रू. ७४.३१ लाख मृद आरोग्य पत्रिका योजनेसाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत (NMSA) मृद आरोग्य पत्रिका या योजनेसाठी सन २०१६-१७ मधील अनुसूचित जाती प्रवर्गाचा केंद्र हिश्यांचा अखर्चित निधी पुर्नजिवित करून सन २०१७-१८ मध्ये खर्च करण्यास केंद्र शासनाने संदर्भ क्र. ०४ येथील पत्रान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार मृद आरोग्य पत्रिका योजनेसाठी अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता रू. १११.४६ लाख (एक कोटी अकरा लाख सेहेचाळीस हजार फक्त) व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रू. ७४.३१ लाख (चव-याहत्तर लाख एकतीस हजार) इतका निधी वितरीत करण्यास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर निधी खालील बाबीवर खर्च करण्यात यावा.

(रू. लाखात)

अ.क्र	घटक	भौतिक	आर्थिक		एकूण	केंद्र हिस्सा वितरीत निधी	राज्य हिस्सा वितरीत निधी
			केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा			
१	मृद नमुने विश्लेषण (रू. १९० प्रति मृद नमुना)	१९० x ९७७७३	१११.४६	७४.३१	१८५.७७	१११.४६	७४.३१

२. या प्रित्यर्थ होणार खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजुर केलेल्या अनुदातून भागविण्यात येऊन खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. डी - ३

२४०२, मृद व जलसंधारण

७८९, विशेष घटक योजना - अनुसूचित जाती

(०१) अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत योजना

(०१) (०१) कृषी उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका (कें.पु.यो)
(केंद्र हिस्सा ६० %) (अनुसूचित जाती) (२४०२ अे ०६८)

३३ - अर्थसहाय्य.

मागणी क्र. डी - ३

२४०२, मृद व जलसंधारण

७८९, विशेष घटक योजना - अनुसूचित जाती

(०१) अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत योजना

(०१) (०२) कृषी उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका (कें.पु.यो)

(राज्य हिस्सा ४० %) (अनुसूचित जाती) (२४०२ अे ०७७)

३३ - अर्थसहाय्य.

३. **सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.**

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात यावी.
२) वितरीत निधी अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाकरिता खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

३) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखापरिक्षण केलेला अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावा.

४) योजनेच्या वेगवेगळ्या बाबीवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

५) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमाखर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चित रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमुद करण्यात यावे जेणेकरून पारदर्शी स्वरूपात सदर रकमा विचारात घेता येतील व संदीग्धता राहणार नाही.

६) मृद आरोग्य पत्रिका वितरित केलेल्या शेतकरी लाभार्थ्याची यादी ग्रामपंचायत/तालुका कार्यालये/पंचायत समिती/जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी.

७) कोणत्याही परिस्थितीत मंजुर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, या बाबत कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) कृषि आयुक्तालय, पुणे यांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

४. कृषि संचालक, (निविष्ठा व गुण नियंत्रण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणुन काम पाहतील व सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे/प्रकियेचे /वित्तीय अधिका-यांच्या मर्यादेत / P.W.D / मॅन्युअलचे अधिन राहून/C.V.C. तत्वानुसार / CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय /नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

५. प्रस्तुतचे आदेश वित्त विभागाच्या अ.नौ.सं.क्र.२०७/व्यय-१४, दि. १३.११.२०१७ आणि ३३३/अर्थ-१३, दि. १६.११.२०१७ आणि सामाजिक न्याय विभाग, यांनी दिलेल्या सहमतीस तसेच प्रधान सचिव (कृषी) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८१२४६१८२००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash R. Kadam

Digitally signed by Prakash R. Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=944e446a6b36b86a52f12def26aa74e1d37e67433a0ce27e6a2caf774b9795c6, cn=Prakash R. Kadam
Date: 2017.12.08 12:54:39 +05'30'

(प्रकाश रा. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक (कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) कृषी संचालक (नि.व गु.नि.), कृषि आयुक्तालय, पुणे
६) सर्व कृषी संचालक / कृषी सहसंचालक कृषि आयुक्तालय, पुणे
७) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
९) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११) वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई
१२) नियोजन विभाग-१४३१
१३) कार्यासन (२अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) निवडनस्ती